# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक १४ एप्रिल २०१५

## व्यक्तीवाद हा लोकशाहीतील अडथळा – रावसाहेब कसबे

मुंबई- जोपर्यंत राजकिय लोकशाहीचे सामाजिक -आर्थिक लोकशाहीत रुपांतर होत नाही तोपर्यंत ख-या अर्थाने लोकशाही अस्तित्वात येणार नाही असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे यांनी केले.मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महात्मा ज्योतिबा फुले –डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहाच्या आजच्या शेवटच्या कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने-डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चिंतन या विषयावर ते बोलत होते.पुढे बोलतांना ते म्हणाले की,आज लोकशाहीसमोरील सर्वात मोठे आव्हान हे व्यक्तीवादाचे आहे.राष्ट्रापेक्षा व्यक्ती मोठे होण्याचा धोका हा लोकशाहीतील मोठा अडथळा आहे.त्याचप्रमाणे जातीसंस्थेचा धोका सुध्दा लोकशाहीसमोरील आव्हान आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मानवाला केंद्रबिंदु मानून भारतीय राज्यघटना तयार केली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सर्व मनुष्यजातीचे नेते होते.ते कोणत्याही एका विशिष्ट जातीचे नेते नव्हते.डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकशाही ही समाजवादी समाजरचनेवरील होती.समाजातील शेवटच्या घटकांचा विकास त्यांना अभिप्रेत होता.बाबासाहेबांना समग्र माणसांचा विकास अभिप्रेत होता.या व्याख्याना दरम्यान त्यांनी अनेक विषयांवर प्रबोधन केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना एका विशिष्ट समाजापुरते अडकवून ठेवणे हा येथील काही जणांनी मुद्दामहून केलेला प्रयत्न असून बाबासाहेबांचे विचार हे त्याही पलीकडचे असून ख-या लोकशाहीसाठी ते प्रेरणा देणारे असेच आहेत असेही ते म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद, त्यांची समतेची मूल्ये, लोकशाही समाजवाद, लोकशाहीचे भवितव्य, राज्यसमाजवादी अर्थव्यवस्था त्यांच्या आंदोलनातील संदर्भ, धर्मांतर, सामाजिक व राजकीय चळवळीची बांधणी व या सर्वांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फुंकलेले बिगूल अशा अनेकविध पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला. डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत असणाऱ्या लोकशाही राज्य घटनेत समाजवादी अर्थव्यवस्था कोणत्याही एका वर्गाच्या हातात जाणार नाही, यासाठी तरतुदी असाव्यात, असेही डॉ. कसबे म्हणाले.तर या कार्यक्रमाप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजन वेळूकर बोलतांना म्हणाले की,समृध्द राष्ट्राच्या संकल्पेसाठी आणि निरोगी समाजस्वास्थ राखावयास जाती धर्माच्या व्युवरचनेतून मानवाला बाहेर पडावे लागेल.भौगोलिक सीमा विस्तारत असतांना जगात जे –जे चांगले आहे ते आत्मसात करण्याची गरज आहे.महापुरुषांच्या शिकवणीचा आजच्या परिस्थीतीनुसार सांगड कशी घालता येणार याचा सर्वानीच विचार करायला हवा,महापुरुषांचे थोर विचार आत्मसात करुन अधिकाअधिक साहित्यनिर्मिती करुन समाजपयोगी योगदान करता येणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२४ व्या जयंती निमित्त त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

आजच्या या दिनाचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने कविता वरे आणि परमेश्वर गुट्टे या दोघा विद्यार्थ्यांना विशेष आर्थिक सहाय्य करण्यात आले.

मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महात्मा ज्योतिबा फुले –डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहाच्या आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक या समितीचे समन्वय प्रा.डॉ.सुरेन्द्र जोंधळे यांनी केले. या कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.नरेशचंद्र,कुलसचिव डॉ.एम.ए.खान,वित्त व लेखा अधिकारी अशोक फळणीकर,विविध प्राधिकरणातील सदस्यांसह,शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्यने उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड ,उपकुलसचिव (जनसंपर्क)